| MHWR040010312018 | नोंदणी दिनांक | : | २५/०७/२०१८ |
|---|---|---|---|
| | दाखल दिनांक | : | २६/०७/२०१८ |
| | निकाल दिनांक | : | २७/०७/२०२६ |
| | कालावधी | | वर्ष. म. दि.<br>०८ ०० ०२ |

**निशाणी क्र.१२ पुढे**

**नमुना क्र.३२**
**पार्ट–अ**
**(न्यायनिर्णयाची शिर्षक पृष्ठ)**
**फौजदारी नियमावली प्रकरण क्र. ६ चा परिच्छेद ४४ (i)**

**सेलु येथील न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग यांचे न्यायालयात**
**ता. सेलु, जि. वर्धा**
**(पिठासीन अधिकारी – एस.आर.सातभाई)**
न्यायनिर्णय घोषीत दिनांक २७/०७/२०२६
**(संक्षिप्त फौजदारी खटला क्र.७६३/२०१८)**

अपराध क्र.४२३/२०१७, पोलीस स्टेशन सेलू, ता.सेलू, जि.वर्धा

| | | |
|---|---|---|
| **अभियोग पक्ष** | | महाराष्ट्र शासन<br>मार्फत पोलीस निरिक्षक, पोलीस स्टेशन सेलू, ता.सेलू व जि.वर्धा. |
| **अभियोग पक्षातर्फे** | | सहाय्यक सरकारी अभियोक्ता –<br>श्रीमती व्ही.एम.गजभिये |
| **आरोपी** | १. | **सुनिल शंकरराव पारसे,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | २. | **सुभाष पुंडलीक पारसे,**<br>वय – ४० वर्षे, व्यवसाय – मजूरी, |
| | ३. | **अनील सुभाष पारसे,**<br>वय – २० वर्षे, व्यवसाय – मजूरी,<br>सर्व रा. – वडगांव(खुर्द), ता.सेलु, जि.वर्धा. |
| **आरोपींतर्फे विधीज्ञ** | | श्री. आर.आर.पाटील |

**भाग – ब**
**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (ii))**

| | | |
|---|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | :– | २४/०५/२०१७ |
| फिर्याद दाखल दिनांक | :– | २५/०५/२०१७ |
| दोषारोपपत्र पाठविल्याचा दिनांक | :– | २५/०७/२०१८ |

| | | |
|---|---|---|
| दोषारोप निश्चित केल्याचे दिनांक | :- | २७/०९/२०१८ |
| पुरावा सुरू झाल्याचा दिनांक | :- | २७/०९/२०१८ |
| न्यायनिर्णयासाठी प्रकरण राखून ठेवल्याचा दिनांक | :- | निरंक |
| न्यायनिर्णय दिनांक | :- | २७/०७/२०२६ |
| न्यायनिर्णयातील शिक्षेसंदर्भात आदेशांचा दिनांक | :- | निरंक |

## आरोपीची माहिती

| आरोपी क्र. | आरोपीचे नांव | अटक दिनांक | जमिनावर सोडल्याचा दिनांक | गुन्हयाचे कलम | अंतिम आदेश | शिक्षा | फौ.प्र.सं.कलम ४२८ अन्वये समायोजित (Set Off) करण्याबाबत कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | सुनिल शंकरराव पारसे | २५/०५/२०१७ | २५/०५/२०१७ | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| २. | सुभाष पुंडलीक पारसे | ०६/०८/२०१७ | ०६/०८/२०१७ | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |
| ३. | अनील सुभाष पारसे | ०६/०८/२०१७ | ०६/०८/२०१७ | भा.दं.वि. कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम १३४ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## भाग –क

**(फौजदारी नियमावली प्रकरण ६ परिच्छेद ४४ (iii))**

**सरकार पक्षातर्फे देण्यात आलेले साक्षीदार/बचाव पक्षातर्फे साक्षीदार/न्यायालयीन साक्षीदार.**

अ. **अभियोग पक्ष**

| सा. | साक्षीदारांचे नांव | स्वरूप | निशाणी |
|---|---|---|---|
| १. | दिलीप चंद्रभान सायरे | साक्षीदार | १२ पुढे |
| २. | राजु प्रकाशरावजी मोगरकर | घटनास्थळ पंच | १२ पुढे |

**ब. बचाव पक्षाचे साक्षीदार** –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

न्यायालयीन साक्षीदार –

| सा. क्र. | साक्षीदारांचे नाव | स्वरुप | निशाणी |
|---|---|---|---|
| --- | --- | --- | --- |

## सरकारी/बचाव/न्यायालयीन कागदोपत्री निशाणांची यादी

अ. अभियोग पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

ब. बचाव पक्ष

| क्रमांक | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| | नाही | |

क. न्यायालयामार्फत निशाणी फक्त आवश्यक कागदोपत्री पुरावा.

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | वर्णन |
|---|---|---|
| १. | निशाणी क्र.१४ | साक्षीदार क्र.२ ची घटनास्थळ पंचनाम्यावरील सहीला |

ड. भौतीक वस्तु -

| अनु क्रमांक | भौतिक वस्तु क्रमांक | तपशील |
|---|---|---|
| | --- | --- |

# न्यायनिर्णय

**(घोषीत दिनांक : २७/०७/२०२६)**

अभियोगपक्षाने सदर खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड संहितेचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अंतर्गत दाखल केला आहे.

**अभियोगपक्षाचे थोडक्यात म्हणणे खालीलप्रमाणे –**

२. दि.२४/०५/२०१७ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या दरम्यान फिर्यादी ही घरी स्वंयपाक करित होती. त्यावेळी फिर्यादीला भांडणाचा आवाज आल्याने फिर्यादी ही घराबाहेर आली असता दिलीप

सायरे यांचे घराजवळ आरोपी सुभाष पारसे, अनिल पारसे व सुनिल पारसे हे तिच्या पतीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करीत होते. फिर्यादी ही मधात पतीला का मारता असे म्हणून सोडविण्यास गेली असता फिर्यादी हिला आरोपी क्र.१ ने तिच्या डाव्या गालावर जोरदार थापड मारली व ढकलुन दिले. त्यामुळे फिर्यादी ही दूर जाउन पडली. तसेच आरोपी क्र.३ ने फिर्यादीला, "चुतमारीचे मधात येउ नको नाहीतर तुझ्या पतीसोबत तुला ही हातपाय जमा करुन मारुन टाकीन" असे म्हणून तिला अश्लील भाषेत शिवीगाळ केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपींविरुद्ध पोलीस स्टेशन सेलू येथे फिर्याद दिली. सदरची फिर्याद पोलीस स्टेशन सेलू येथे अपराध क्र.४२३/२०१७ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ अन्वये आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला.

३. तपासकामी तपासी अधिकारी श्री. सुहास मडावी यांनी फिर्यादी व साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळ पंचनामा केला. वैद्यकीय प्रमाणपत्र हस्तगत केले. आरोपींना अटक करुन अटक फार्म तयार केले. आरोपींविरुद्ध सबळ पुरावा मिळुन आल्याने, त्यांचे विरुद्ध दोषारोपपत्र न्यायालयात दाखल केले.

४. आरोपींविरुद्ध दोषारोप निश्चीत करुन त्यातील मजकूर आरोपींना वाचून दाखविला व त्यांना मराठी भाषेमध्ये समजावून सांगण्यात आला. आरोपींनी तो अमान्य करुन प्रकरण चालविण्यासाठी विनंती केली. आरोपींविरुद्ध अभियोगपक्षाने नोंदविलेल्या साक्षीपुराव्यातुन गुन्हयाशी

संबंधीत कोणताही मजकूर अभिलेखावर आला नाही, त्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३(१) (ब) नुसार बयान नोंदविण्यात आले नाही. प्रस्तुत प्रकरणात विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता व्ही.एम.गजभिये तसेच आरोपींतर्फे विद्वान वकील आर.आर.पाटील यांच्या युक्तिवाद ऐकण्यात आला.

५. अभियोगपक्षाचे म्हणणे विचारात घेता, खालील बाबी विचारार्थ येत असून त्यावरील निष्कर्ष कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोगपक्ष हे सिद्ध करतो आहे काय दिनांक २४/०५/२०१७ रोजी ०९.०० ते ०९.१५ वाजताच्या सुमारास वडगांव (खुर्द), सेलू, तालुका सेलू व जिल्हा वर्धा येथे आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादी वैशाली शंकरराव खोबे हिला, "तु चुतमारीचे मदात येवू नको नाहीतर तुझ्या पतीसोबत तुलाही हातपाय जमा करुन मारुन टाकीन" अश्या अश्लील भाषेत शिवीगाळ केली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम २९४ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | नकारार्थी |
| २. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीचा अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०४ सहकलम ३४ अन्वये गुन्हा केला ? | नकारार्थी |

| | | |
|---|---|---|
| ३. | वर नमूद तारीख, वेळ व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीच्या मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ५०६ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला ? | **नकारार्थी** |
| ४. | वर नमुद तारीख, वेळी व ठिकाणी आरोपींनी आपसी संगनमताने आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या डाव्या गालावर जोरदार थापड मारली व ढकलुन दिले व हल्ला केला आणि तिला स्वेच्छेने दुखापत केली, त्याद्वारे आरोपींनी भारतीय दंड विधानाचे कलम ३२३ सहकलम ३४ प्रमाणे गुन्हा केला आहे ? | **नकारार्थी** |
| ५. | आदेश काय ? | **अंतिम आदेशाप्रमाणे आरोपी निर्दोष मुक्त.** |

## ...कारणमिमांसा...

६. अभियोगपक्षाने आरोपींविरुध्द वर नमुद गुन्हे सिध्द करण्यासाठी फक्त दोन साक्षीदार तपासले आहे. अभियोगपक्षाने आरोपीवरील दोषारोपीत गुन्हे सिद्ध करण्यासाठी अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ नामे दिलीप चंद्रभान सायरे यांना निशाणी क्र.१२ पुढे व साक्षीदार क्र.२ नामे राजु प्रकाशरावजी मोगरकर (पंच) यांना निशाणी क्र.१२ पुढे तपासले आहे.

७. अभियोगपक्षाने आरोपींवरील गुन्हे सिद्ध करण्यासाठी आरोपींनी आपसी संगनमताने फिर्यादीला सार्वजनिक ठिकाणी अश्लील भाषेत शिवीगाळ केली, फिर्यादीचा अपमानकरुन त्यायोगे प्रक्षोभनामुळे त्यांच्याकडून सार्वजनिक शांततेचा भंग होईल किंवा अन्य कोणताही अपराध घडेल अश्या उद्देशाने शिवीगाळ करुन त्यांचा अपमान केला, फिर्यादीच्या

मनात भिती उत्पन्न करण्याच्या उद्देशाने जिवे मारण्याची धमकी दिली व फौजदारी पात्र धाकदपटशा दाखविली तसेच आरोपींनी आपसी संगनमताने आरोपी क्र.१ ने फिर्यादीच्या डाव्या गालावर जोरदार थापड मारली व ढकलुन दिले व हल्ला केला आणि तिला स्वेच्छेने दुखापत केली, हे सिद्ध करणे आवश्यक आहे.

**मुद्दे क्र.१ ते ४ करीता :**

८. वरील सर्व मुद्दे एकाच प्रकारच्या पुराव्यावर अवलंबुन आहेत. त्यामुळे पुनरावृत्ती टाळण्यासाठी सदरचे मुद्दे एकत्रात विचारार्थ घेत आहे.

९. अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.१ दिलीप चंद्रभान सायरे यांना निशाणी क्र.१२ पुढे नोंदविलेले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, ते सर्व आरोपींना व फिर्यादीला ओळखते. ते सर्व त्यांच्या गावातील रहिवाशी आहे. त्यांना घटनेची तारीख माहित नाही. घटनेबाबत त्यांना काहीही माहित नाही. त्यांचे समक्ष कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी घटनेबाबत त्यांचे कडे चौकशी केली नाही व त्यांचा जबाब नोंदविला नाही असे त्यांनी सांगितले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. त्यामध्ये साक्षीदाराने नाकारले आहे की, दि.२४/०५/२०१७ रोजी रात्री ०९.०० वाजताच्या सुमारास ते फिर्यादीच्या घराकडे गेले असता आरोपी हे फिर्यादीच्या पतीला मारहाण करत होते व शिवीगाळ करत होते. फिर्यादी ही

भांडण सोडविण्यास गेली असता आरोपींनी तिला देखील अश्लील शिवीगाळ केली. त्यांनी स्वतः भांडण सोडविले. अभियोगपक्षास साक्षीदाराचा उलटतपासात आरोपींविरुध्द उपयुक्त असा कोणताही मजकूर अभिलेखावर आणता आला नाही. त्यामुळे साक्षीदाराची साक्ष आरोपींवरील गुन्हा शाबित करण्यास पुरेशी नाही.

**१०.** अभियोगपक्षाने आरोपींवरील दोषारोप सिद्ध करण्यासाठी साक्षीदार क्र.२ राजु प्रकाशरावजी मोगरकर यांना निशाणी क्र.१२ पुढे नोंदविण्यात आले आहे. साक्षीदाराने त्यांच्या शपथेवरील जबाबात कथन केले की, त्यांना पोलीसांनी दि.२५/०५/२०१७ रोजी पंचनामा करण्याकरिता कुठेही बोलविले नाही. पोलीसांनी त्यांच्या समक्ष कोणताही पंचनामा केला नाही. त्यांना सदरचा घटनास्थळ पंचनामा दाखविण्यात आला, त्यावर त्यांची सही असुन त्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहित नसल्याचे कथन केले. सदरचा साक्षीदार अभियोगपक्षास सहकार्य करीत नसल्यामुळे न्यायालयाचा परवानगीने सरकारी वकिलांनी त्यांचा उलटतपास घेतला. परंतु त्यामध्ये साक्षीदाराने सर्व प्रतिकुल सूचना नाकारलेले आहे.

**११.** उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. प्रस्तुत प्रकरणात फिर्यादी यांना वारंवार साक्ष समंस देण्यात आले, परंतु फिर्यादी हे साक्ष

देण्यासाठी न्यायालयात हजर झाले नाही, त्यामुळे फिर्याद शाबित झालेली नाही. स्वतंत्र साक्षीदार म्हणून तपासण्यात आलेले अभियोगपक्ष साक्षीदार क्र.१ ने अभियोगपक्षाच्या कथनास दुजोरा दिलेला नाही. त्यांच्या साक्षीनुसार त्यांना घटनेची तारीख माहित नाही. घटनेबाबत त्यांना काहीही माहित नाही. त्यांचे समक्ष कोणतीही घटना घडली नाही. पोलीसांनी घटनेबाबत त्यांचे कडे चौकशी केली नाही व त्यांचा जबाब नोंदविलेले नसल्याचे सांगितले. त्यांच्या साक्षीत फिर्यादीला शिवीगाळ झाल्याचे तसेच मारहाण झाल्याचे समर्थन आढळत नाही. अभियोगपक्षास या साक्षीदाराकडून आरोपींविरुद्ध कोणताही ठोस व निर्विवाद पुरावा सिद्ध करता आलेला नाही.

**१२.** घटनास्थळ पंच म्हणून तपासण्यात आलेल्या सा.क्र.२ यांनी त्यांच्या साक्षीत त्यांच्या समक्ष पोलीसांनी कोणताही पंचनामा केला नाही. तसेच पंचनाम्यातील मजकूराबाबत त्यांना काहीही माहिती नाही असे त्यांनी सांगितले. त्यामुळे पंचनामा प्रत्यक्ष घटनास्थळी व तत्काळ तयार झाल्याबाबत शंका निर्माण होते. तसेच अभियोगपक्षाने दुसरा पंच साक्षीदार तपासले नाही. अशा परिस्थितीत घटनास्थळ पंचनामा हे सिद्ध झालेले नाही.

**१३.** सदर प्रकरणात प्रत्यक्षदर्शी साक्षीदार विश्वासार्ह आहे ना पंचनामा विश्वसनीय आहेत. फौजदारी खटल्यामध्ये अभियोगपक्षावर आरोप संशयाच्या पलीकडे सिद्ध करण्याची जबाबदारी असते व केवळ शक्यता, अंदाज अथवा तर्काच्या आधारे आरोपींना दोषी ठरविता येत नाही. तसेच

प्रस्तुतच्या प्रकरणात अभियोगपक्षाने वैद्यकीय अधिकारी व तपासी अधिकारी यांना तपासलेले नाही. त्यामुळे भरपूर सा–या गोष्टया अभिलेखावर आलेल्या नाही. त्यामुळे घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. उपलब्ध साक्षपुराव्याचे बारकाईने निरीक्षण केले असता अभियोगपक्षाच्या कथनाप्रमाणे आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द होण्याईतपत कोणताही साक्षीपुरावा अभिलेखावर आलेला नाही. तसेच घटना घडली होती किंवा नाही असे ठामपणे म्हणता येणार नाही. त्यामुळे आरोपींविरूध्द कोणताही सबळ पुरावा अभिलेखावर आलेला नाही. त्यामुळे आरोपींनी भा.दं.वि.चे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ नुसार गुन्हा केल्याची बाब सिध्द झालेली नाही. वरील विवेचनावरुन मी मुद्दे क्र.१ ते ४ चे नकारार्थी उत्तर नोंदवित आहे.

**मुद्दा क्र.५ बाबत :**

**१४.** उपरोक्त पुराव्याचे विश्लेषण करता व एकंदर कायदेविषयी परिस्थितीचा बारकाईने विचार करता, अभियोग पक्ष आरोपींविरूध्दचा गुन्हा सिध्द करण्यास अपयशी ठरला आहे. सबब, उपरोक्त गुन्हयातून साक्षपुराव्या अभावी संशयाचा फायदा देउन आरोपींची निर्दोष मुक्तता करणे मला न्यायोचित वाटते. परिणामत: मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.१ **सुनिल शंकरराव पारसे**, आरोपी क्र.२ **सुभाष पुंडलीक पारसे** व आरोपी क्र.३ **अनिल सुभाष पारसे** यांची भारतीय नागरिक सुरक्षा संहिताचे कलम २७१(१) [फौजदारी प्रक्रिया संहिताचे कलम

२४८(१)] अन्वये गुन्हा क्र.४२३/२०१७ भारतीय दंड विधानाचे कलम २९४, ३२३, ५०४, ५०६ सहकलम ३४ पोलीस स्टेशन सेलू, या गुन्हयातुन निर्दोष मुक्तता करण्यात येत आहे.

२. आरोपींचे जमानतनामा व वैयक्तीक बंधपत्र रद्द करण्यात येते.

३. आरोपींनी प्रत्येकी रक्कम रु. १५,०००/– चा वैयक्तीक मुचलका भारतीय नागरीक सुरक्षा संहिताचे कलम ४८१ [फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७–अ] प्रमाणे दाखल करुन पुर्तता करावे.

(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहिर करण्यात आला.)

SHAILESH RAJENDRA SATBHAI
Digitally signed by SHAILESH RAJENDRA SATBHAI
Date: 2026.07.27 17:18:34 +0530

( एस.आर.सातभाई )

**दिनांक** : २७/०७/२०२६ न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, सेलू

**CERTIFICATE**

I affirm that the contents of this P.D.F. file is same, word to word as per the original.

(R. M. Khan)
Stenographer (Grade-III)